# प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा येथील कबड्डी चमूचे सुयश

**माऊली ग्रुप ऑफ इन्स्टीट्यूशनस् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी, शेगाव द्वारा " ignite - 2023 " स्पर्धेत उत्कृष्ठ कामगिरी**




**अमरावती** | स्थानिक विदर्भ युथ वेलफेयर सोसायटीद्वारा संचालित प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च बडनेरा येथील कबड्डी चमूने नुकत्याच झालेल्या माऊली ग्रुप ऑफ इन्स्टीट्यूशनस् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी, शेगाव द्वारा " ignite - 2023" मध्ये पहिला स्थान पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. इंजिनीरिंग महाविद्यालयातील चमूने विद्यापीठ स्तरीय स्पर्धेत अशी कामगिरी करणे प्रशंसनीय आहे. याचे आयोजन माऊली ग्रुप ऑफ इन्स्टीट्यूशनस् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी, शेगाव येथे करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये प्रथम स्थान प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च बडनेरा यांनी पटकावले.

प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च बडनेरा महाविद्यालयाच्या चमूमध्ये अखिलेश राजेंद्र काळे, कुलदीप अर्जुनराव काळे, मित्तल भाष्करराव वावगे, मानस रविकांत गवई, समीर विजय ढोरे, अभिजीत प्रदीपराव राऊत, आदेशकुमार अनिल वारघाट, अनिकेत सुनील गेडाम, जय रवींद्र चव्हाण, वैष्णवी पाथरे, या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. आर. बमनोटे यांनी विजयी संघाचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीकरिता शुभेच्या दिल्या. महाविद्यालयाचे स्पोर्ट्स डायरेक्टर प्रा. राज देशमुख व महाविद्यालयातील सर्व प्राध्यपकांचे विजयी चमूने आभार व्यक्त केले व आपल्या विजयात महाविद्यालयाचा मोलाचा वाटा असल्याचे आपल्या मनोगतात व्यक्त केले. महाविद्यालयातील सर्व डीन, विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी तसेच विदर्भ युथ वेलफेयर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीनजी धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, कार्यकारिणी सदस्य, प्रा. शंकररावजी काळे, नितीन हिवसे, प्रा. रागिणीताई देशमुख, डॉ. वैशाली धांडे आणि डॉ. पूनम चौधरी यांनी विजेत्या चमूचे भरभरून कौतुक केले व पुढील वाटचालीकरिता आशीर्वाद व शुभेच्छा दिल्या.